पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर
नविन प्रशासकिय इमारत संकुल, प्लॉट नं. १, सेक्टर – १५
मोरेकुरण रोड, कोळगाव, नवनगर, ता. जि. पालघर
दुरध्वनी – ०२५२५ - २५११००
E-mail: - sp.palghar@mahapolice.gmail.com

प्रेसनोट क्र.१६ दि.१४/०२/२०२६

पालघर जिल्हा पोलीस शिपाई भरती प्रक्रियेबाबत...

पोलीस अधीक्षक, पालघर श्री. यतिश देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली पालघर जिल्हा पोलीस दलाचे आस्थापनेवर पोलीस शिपाई पदाच्या १५८ रिक्त जागा व चालक पोलीस शिपाई पदाच्या ७ रिक्त जागांसाठी पोलीस भरतीची मैदानी चाचणी दिनांक ११/०२/२०२६ ते दि.२५/०२/२०२६ या कालावधीत पोलीस मुख्यालयाच्या पोलीस परेड ग्राउंड, कोळगाव, पालघर या मैदानात सुरू झालेली आहे.

पोलीस भरतीकरीता एकूण ९१०९ त्यामध्ये पुरुष ७७६३ व महिला १४४६ उमेदवारांचे आवेदन अर्ज पोलीस अधीक्षक कार्यालय, पालघर येथे प्राप्त झालेले आहेत.

दिनांक १४/०२/२०२६ रोजी पर्यंत पोलीस भरतीचे मैदानी चाचणीकरीता १९२० उमेदवार हजर झाले. त्यापैकी १५१३ उमेदवार पात्र झाले असून ४०७ उमेदवार अपात्र झाले आहेत.

पालघर पोलीस दलातील पोलीस भरती प्रक्रिया पारदर्शक असून जास्तीत जास्त तंत्रज्ञानाचा वापर करण्यात येत आहे तसेच सर्व प्रक्रियेचे संपुर्ण शुटींग करण्यात येत आहे. त्यासाठी मैदानावर सी.सी.टी.व्ही कॅमेरे, स्टॅटीक कॅमेरे, हॅन्डीकॅम अशी व्यवस्था केलेली आहे.

उमेदवारांना मैदानात कॅन्टनची व्यवस्था करण्यात आलेली असून पालघर जिल्हा पोलीस दालातर्फे उमेदवारांना केळी, बिस्कीट, पिण्याचे पाणी, ओआरएस अशी व्यवस्था करण्यात आलेली आहे.

पोलीस भरतीकरीता मैदानी चाचणी दरम्यान उमेदवारांना दुखापत झाल्यास मैदानाचे ठिकाणी वैद्यकीय पथक हजर असून ॲम्बुलन्स सज्ज ठेवण्यात आलेले आहे.

पालघर जिल्हा पोलीस दलाकडून पोलीस भरतीकरीता लांबून येणाऱ्या उमेदवारांसाठी निवासस्थानाची व्यवस्था करण्यात आली असून १) आंबामाता मंदिर, पाचबत्ती नाका, पालघर २) उमरोळी ग्रामपंचयत हॉल, उमरोळी ३) पद्मनाभ स्वामी मंदिर, टेंभोडे या ठिकाणी निवासाची व्यवस्था करण्यात आली आहे.

सदरची पोलीस भरती प्रक्रिया पारदर्शक निपक्षपातीपणे सुरू झालेली असून, कोणत्याही गैरप्रकाराला यामध्ये थारा असणार नाही. कोणत्याही व्यक्तीकडून ओळखीचे, आमिष दाखवून, पैशाची मागणी करीत असल्यास किंवा आर्थिक गैरव्यवहाराचा संशय आल्यास तात्काळ **पोलीस नियंत्रण कक्ष, पालघर दुरध्वनी क्रमांक ०२५२५-२०५३००/२०५३१४ तसेच पोलीस हेल्पलाईन क्रमांक ८६६९६०४००४/८६६९६०४०७० या मोबाईल क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन पालघर जिल्हा पोलीस दलातर्फे पोलीस अधीक्षक श्री. यतिश देशमुख यांनी केले आहे.**